**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २० नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

- **राज्यात विधानसभेकरीता ५ वाजेपर्यंत सरासरी ५८.२२ टक्के मतदान; नागपूर जिल्ह्यात ५६.०६ टक्के मतदानाची नोंद.**
- **नागपूर जिल्ह्यातील उमरेड मतदारसंघात सर्वाधिक ६७.३७ टक्के मतदान; तर विदर्भात गडचिरोली जिल्ह्याच्या आरमोरी मतदारसंघात सर्वाधिक ७१.२६ टक्के मतदानाची नोंद.**
- **विदर्भात राजकीय पुढाऱ्यांसह सर्वांचे उत्साहात मतदान; वैशिष्ट्यपूर्ण मतदान केंद्रांनी आकर्षित केले मतदार.**
- **५५व्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून गोव्यात सुरुवात; मायकेल ग्रेसी दिग्दर्शित 'बेटर मॅन' या चित्रपटानं महोत्सवाची सुरुवात.**

मतदान टक्केवारी-राज्य-विदर्भ-नागपूर

राज्यात २८८ विधानसभा मतदार संघांसोबत नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठीच्या मतदान प्रक्रियेला आज सकाळी सात वाजता सर्वत्र प्रारंभ झाला . राज्यात नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार असून; एक लाख ४२७ मतदान केंद्र उभारण्यात आली होती. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत मतदान घेण्यात आलं. विधानसभा निवडणुकीसाठी आज काही अपवाद वगळता राज्यभरात शांततेत मतदान झालं.

संध्याकाळी ५ वाजेपर्यंत राज्यात सरासरी 58.22 टक्के मतदानाची नोंद आहे. गोंदिया जिल्ह्यातील आमगाव आणी अर्जुनी मोरगाव हे मतदार संघ नक्षलग्रस्त भागात येत असल्यामुळे या दोन्ही मतदारसंघात सकाळी 7 ते दुपारी 3 वाजे पर्यत मतदानाची वेळ होती. इथे 65.09 टक्के मतदान झालं. गडचिरोली जिल्ह्यात देखील दुपारी ३ वाजेपर्यंत मतदान झालं. राज्यात सर्वाधिक मतदान

गडचिरोली जिल्ह्यात झालं. गडचिरोली जिल्ह्यातील तीन मतदारसंघात सरासरी 69.63टक्के मतदान झालं. त्यात सर्वाधिक मतदान आरमोरी मतदार संघात 71.26, गडचिरोलीत 69.22 आणि अहेरी इथं 68.43 टक्के मतदान झालं. विदर्भातील जिल्हा निहाय मतदानाची टक्केवारी बघता अकोला इथं 56.16 टक्के, अमरावती 58.48 टक्के, भंडारा 65.88 टक्के, बुलढाणा 62.84 टक्के, चंद्रपूर 64.48 टक्के, गडचिरोली 69.63 टक्के, गोंदिया 65.09 टक्के, नागपूर 56.06 टक्के, वर्धा 63.50 टक्के, वाशिम 57.42 टक्के आणि यवतमाळ 61.22 टक्के मतदान झाल्याची नोंद आहे.

केवळ नागपूर जिल्ह्यातील मतदारसंघांतिल मतदान टक्केवारी बघता हिंगणा इथं 55.79 टक्के, कामठी 53.45 टक्के, काटोल 59.43 टक्के, नागपूर मध्य 50.67 टक्के, नागपूर पूर्व 55.98 टक्के, नागपूर उत्तर 51.70 टक्के, नागपूर दक्षिण 53.36 टक्के, नागपुर दक्षिण-पश्चिम 51.54 टक्के, नागपूर पश्चिम 51.89 टक्के, रामटेक 65.59 टक्के सावनेर 64.23 टक्के, उमरेड 67.37 टक्के मतदान झाले आहे. आतापर्यंत रांगेत उभ्या असलेले मतदार मतदान करीत आहेत.

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत ६३ टक्क्यांपेक्षा जास्त आणि गेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यात ६१ पूर्णांक १ दशांश टक्के मतदानाची नोंद झाली होती. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ६१ पूर्णांक ३३ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता.

उभे उमेदवार

निवडणुकीसाठी यंदा चार हजार १३६ उमेदवार रिंगणात आहेत. त्यात तीन हजार ७७१ पुरुष, ३६३ महिला आणि दोन तृतीयपंथी आहेत. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ३०३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत, तर सर्वात कमी १७ उमेदवार सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत.

राजकीय नेत्यांचे मतदान

राज्यातली पहिल्या क्रमांकाची मतदार रविता पंकज तडवी हिनं नंदुरबार जिल्ह्यातल्या प्रथम क्रमांकाच्या मणिबेलीतल्या केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते **नितीन गडकरी** यांनी आपल्या कुटुंबियां समवेत महाल परिसरातील टाऊन हॉल मतदान केंद्रात आपल्या मतदानाचा अधिकार बजावला. तर पश्चिम नागपूरातील धरमपेठ येथील डीक दवाखाना येथील मतदान केंद्रावर **देवेन्द्र फडणवीस** यांनी कुटुंबीयासोबत मतदान केलं. महायुतीचे सावनेर उमेदवार **डॉ.आशिष देशमुख** यांनी सहपरिवार मतदान केलं. भाजपचे प्रदेशाध्यक्ष आणि कामठी इथले महायुतीचे उमेदवार **चंद्रशेखर बावनकुळे** यांनी कामठी परिसरातील नांदा इथं आपला मतदानाचा हक्क सहकुटुंब बजावला. **नागपुरात** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी आज सकाळी 7 वाजता महाल इथल्या भाऊजी दप्तरी शाळेत मतदानाचा आपला हक्क बजाविला. मोहन भागवत हे या मतदान केंद्रात मतदान करणारे पहिले मतदार ठरले. राष्ट्र सेविका समितिच्या प्रमुख संचालिका शांताक्का, यांनी आज सुळे शाळेत मतदान केलं. राज्याचे माजी मंत्री आणि उत्तर नागपूर विधानसभा क्षेत्राचे काँग्रेस, महाविकास आघाडीचे उमेदवार **डॉ. नितीन राऊत** यांनी आज सकाळी बेझनबाग इथल्या गुरुनानक विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज मध्ये सहपरिवार आपल्या मतदानाचा हक्क बजावला. **भंडारा** जिल्ह्यातील साकोली विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि साकोली मतदारसंघाचे काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार **नाना पटोले** यांनी कुटुंबीयांसमवेत मतदानाचा हक्क बजावला. **चंद्रपूर** जिल्ह्यात बल्लारपूर विधानसभा मतदारसंघाचे भाजप-महायुतीचे अधिकृत उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी सहपरिवार मतदान केलं. तर केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी **मेहकर** मधील मुळगाव मादणी इथं मतदान केलं तर चंद्रपूरच्या ब्रम्हपुरी येथील देलनवाडी बूथवर **विधानसभेतील विरोधी पक्ष नेते विजय वड्डेट्टीवार** यांनी कुटुंबासह मतदानाचा हक्क बजावला. **अकोल्यात** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते एडवोकेट **प्रकाश आंबेडकर** आणि अंजली आंबेडकर यांनी कृषी नगर येथे आपल्या मतदानाचा हक्क बजावला. **गोंदिया** जिल्ह्यातील आमगाव देवरी विधानसभा क्षेत्राचे महायुतीचे उमेदवार संजय पुराम यांनी सह कुटुंब मतदान केले. तसच गोंदिया विधानसभा

क्षेत्राचे महायुतीचे उमेदवार विनोद अग्रवाल यांनी सह कुटूंब मतदान केले. यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस मतदारसंघातील शिवसेना महायुतीचे उमेदवार **संजय राठोड** यांनी आज दारव्हा इथल्या माध्यमिक कन्या शाळेत सहपरिवार मतदानाचा हक्क बजावला.

वैशिष्ट्यपूर्ण मतदान केंद्/दिव्यांग-ज्येष्ठ मतदार

आज लोकशाहीच्या उत्सवात अधिकाधिक मतदारांना आकर्षित करण्यासाठी अनेक ठिकाणी संकल्पना आधारित वैशिषट्यपूर्ण मतदान केंद्र उभारण्यात आली होती. मतदारांचे स्वागत करण्यासाठी मतदान केंद्र वैविध्यपूर्ण पद्धतीने सजविण्यात आली. उत्तर नागपूरच्या पाचपावली इथं तृतीयपंथीयांसाठी उभारलेलं इंद्रधनुष्याच्या रंगाचे मतदान केंद्र आकर्षणाचं केंद्र  ठरलं.पंचायत समिती कळमेश्वर इथल्या आदर्श मतदान केंद्रात सुंदर रांगोळ्या काढण्यात आल्या. रामटेक तालुक्यातील कट्टा या मतदान केंद्रावर आदिवासी मॉडेल साकारण्यात आले. आदिवासींची जीवनपद्धती, खाद्य संस्कृती, आदी संकल्पना घेऊन संबंध केंद्र सजविण्यात आलं. नागपूर जिल्ह्यातील 11 ठिकाणच्या हाय राईज बिल्डिंग अर्थात उंच इमारती मध्ये आज मतदान पार पडलं. निवडणूक विभागाकडून यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. याशिवाय विदर्भात विविध ठिकाणी लक्षवेधक मतदान केंद्र तयार करण्यात आली. त्यात महिला विशेष, युवक विशेष, दिव्यांग विशेष, हरित अशा विविध प्रकारच्या संकल्पनांवर आधारित मतदान केंद्र पाहायला मिळाली. यंदा ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. **गडचिरोली** इथल्या पंचायत समितीत महिलांद्वारे संचालित सखी मतदान केंद्र गुलबी रंगाचे फुगे आणि अन्य साहित्याने केंद्र सजविण्यात आले. त्याचप्रमाणे आरमोरी शहरातील सखी मतदान केंद्रावर महिला पारंपरिक वेशभूषेत लेझीम पथकासह मतदान करण्यासाठी पोहचल्या. **भंडारा** जिल्ह्यातील साकोली विधानसभा मतदार संघातील मौजा वलमाझरी इथं जैव विविधतेवर आधारित आदर्श मतदार केन्द्र तयार करण्यात आलं.  या केन्द्रात विविध जैव विविधतेचे दर्शन आणि वन्यप्राण्याविषयी आपुलकी सांगणारे संदेश चित्रांच्या  माध्यमातून देण्यात आले. मतदान केंद्राच्या प्रवेश द्वारावर सुंदर गुहा साकारण्यात आली. दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदारांनी देखील उत्साहाने मतदान केलं. गडचिरोलीत १११ वर्षांच्या फुलमती बिनोद सरकार

यांनी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान केलं. 95 वर्षीय मंदाकिनी बेलसरे यांनी नागपूरच्या ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भच्या आवाहनास प्रतिसाद देऊन मतदान केलं.

इफ्फि

५५वा इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून गोव्यात सुरुवात होत आहे. संध्याकाळी उद्‌घाटन सोहळ्यात भारतीय सिनेमाचा मूकपटापासून ते आत्तापर्यंतचा प्रवास दर्शवणारा कार्यक्रम सादर होईल. ८१ देशातले १८० चित्रपट हे महोत्सवाचं आकर्षण असून ऑस्ट्रेलियन चित्रपट निर्माते मायकेल ग्रेसी दिग्दर्शित ‘बेटरमॅन’ या चित्रपटानं महोत्सवाची सुरुवात होईल. येत्या २८ नोव्हेंबरपर्यंत हा महोत्सव चालणार आहे.

****